# ४. कोंबडीचे पिल्लू, बेडूक, बांबूचे झाड

काय शीर्षक जरा विचित्रच वाटते ना ? परंतु हे शीर्षक बरोबरच आहे.

माझ्या ऑफीसच्या टेबलावर ह्या ३ वस्तु इतर पसा-याबरोबर बरोबरीने विराजमान आहेत. अर्थात बांबूचे झाड मात्र जिवंत/ खरे आहे तर बेडूक व कोंबडीचे पिल्लू खोटे आहे.

माझ्याकडे येणारी प्रत्येक व्यक्ती ह्या ३ गोष्टी कौतूकाने बघते. काहीजण धीर करून मला विचारतात. त्याचीच ही गोष्ट.

लहानपणापासून कोंबडी, तीची पिल्ले यांचे मला आकर्षण आहे. मी ब्राह्मण त्यामुळे अर्थातच खाण्यासाठी हे आकर्षण नाही. नाही म्हणायला मोठा झाल्यावर काही शेकडा कोंबडयांना २०/ २५ वर्षात पोटात आसरा दिला असेन पण तो भाग वेगळा.लहान असताना माझे दादा ( भाई नव्हेत आजचा भाषेप्रमाणे म्हणून खुलासा ) उर्फ पिताश्री मला Poultry च्या प्रदर्शनाला घेऊन जात असत. पिंज-यामध्ये एक दिवसांची पिल्ले ठेवलेली असत. ती लहान गोजिरवाणी पिल्ले मला भुरळ पाडत व बराच वेळ मी त्या पिंज-यापुढून हलतच नसे.एवढासा जीव मुठीत सुद्धा मावेल. आपल्या आईला सोडून कुठच्या तरी प्रवासासाठी एकटा काढलेला असे, ते बघुन मी मनात दुःखी होई.

मी पण लहानपणी आई वडिलांना सोडून एकटा रहात असे. काकूबरोबर , बहिणीबरोबर. कारण वडिल आजारपणा मुळे तळेगावला इस्पितळा मध्ये भरती होत व आईपण त्यांची सेवा करायला त्यांच्याबरोबर असे. माझी ही लहानपणाची हूरहूर माझ्या बायकोने लक्षात ठेवली होती. त्यामुळेच एकदा बाजारात हूबेहूब कोंबडीचे पिल्लू दिसल्याबरोबर माझ्यासाठी तीने ते विकत घेतले व त्यादिवसांपासून माझ्या टेबलावर विराजमान झाले.

आजही दिवसातून एकदा तरी मी त्या पिल्लाला हात लावतो. कदाचित मी माझ्या बालपणालाच स्पर्श करत असेन ?
कदाचित मी समर्थपणे वर्णन करू शकणार नाही. पण तेव्हढाच आकार, रंग, रूप, इवलीशी चोच, डोळयांतील कावरेबावरे भाव मला आजही माझ्या बालपणाच्या दिवसांची, स्मृतींची आठवण करून देतात.

<u>बेडूक ः</u> साधारणपणे हल्लींच्या मुलांना बेडूक चित्रातच माहीती असेल पण लहानपणी गावाला व मुंबईत सुद्धा बेडूक दिसत. आजही उपनगरात पाऊस पडायला लागल्यानंतर त्यांची डॅराव डॅराव ऐकायला येते. मग हे बेडूक वर्षभर काठे

असतात ? ते जमीनीखाली, ओलसर जागी स्वतःला गाडून घेतात व पाऊस पडल्यावर जमीनीवर येतात. मला हे वागणे डोळसपणे प्रत्येक माणसाने स्वीकारावे असे वाटते.
जेव्हा जेव्हा अडचणी येतील तेव्हा शांत राहून असेल ती परिस्थिती स्वीकारावी व आपली वेळ येताच वेगळा मार्ग स्वीकारावा.

हा बेडूकही प्लॅस्टीकचा असला तरी हूबेहूब ख-या बेडकासारखाच आहे. रंग, आकार, डोळे इत्यादी. आपल्याला बेडकाची किळस का वाटते ? खरोखर बेडकाच्या ओरडण्याने आपल्याला पावसाची खबर मिळते, बेडकाचे पाय निर्यात होतात, बेडकाचा शिक्षणासाठी कॉलेजच्या प्रयोगशाळेत वापर होतो. आपण वेळोवेळी नेमके कसे वागले पाहिजे ह्याचे तो धडे देतो. तर अशा ह्या प्राण्याबद्यल किळस का ?

कारण असे तर नाही ना कि माणसाला फक्त प्रत्येक सुंदर गोष्टच आवडते ? कोठून आली ही भोगविलास संस्कृति ? उपयोगाच्या वस्तूंचे , गोष्टींचे स्मरण ही नको ? कामापुरता मामा आपण म्हणतो ते काही चूक नाही.

बांबूचे झाड ः हे मात्र खरेच आहे. लोकांना वाटते की फेंगचुईच्या प्रभावामुळे मी झाड टेबलवर ठेवले आहे. परंतु मी मात्र बरेच वर्ष वेगवेगळी झाडे, रोपे माझ्या टेबलावर ठेवतो आहे. कधी लहान कुंडीत गव्हांकुर, पावटयाची इवली इवली रोपे, दुर्वा इत्यादी. पण एकदा माझ्या मित्राने मला त्याच्या घरातील बांबूच्या झाडाची १ फांदी दिली. तीच फांदी मी एक ग्लासात पाण्यात ठेवली. काही दिवसांनी फांदीला मूळ फुटले. मी आणखीन २-३ लहान फांदया आणल्या व ग्लासात ठेवल्या. काही महिन्यातच ग्लासभर फांद्या / रोपे तयार झाली.
मी अर्थातच बाहेर बांबूची रोपे विकत मिळतात तसा आकार त्याला दिला नाही. आकार दिलेली रोपे मला कडक शिस्तीत वाढवलेल्या अनाथाश्रमातील मुलांसारखी वाटतात. मी मात्र सर्व फांद्यांना मोकळीक दिली आहे. नवीन फुटणारी मुळे, इवलीशी पाने जीवनातील आनंद वाढवतात. आयुष्यातील बदल म्हणजे काय त्याचे वारंवार प्रत्यय देतात.

माणसाला जर का प्रगति करावयाची असेल तर बदल हे स्वीकारावेच लागतात. बदलांचा कानोसा घ्यावा लागतो व स्वतःला बदलांसाठी तयार करावे लागले नाहीतर हेच बदल आपल्यावर लादले जातात व आपण पराभूत होतो कारण वेळच निघून गेलेली असते.

खरेच माझ्या टेबलवरील पिवळे कोंबडीचे पिल्लू व हिरवा बेडूक व हिरवे बांबूचे झाड बरेच काही सांगून जाते. पण हे सर्व समजून घेण्याचा संयम मात्र प्रश्नकर्त्याकडे नसतो. म्हणूनच ही गोष्ट!!!